**मी टिकेला उत्तर देत नाही, जनतेची कामे करतो... कामातून उत्तर द्यायचं अशी आम्हाला शिकवण**


दिशादर्शक, मार्गदर्शक!

# दिवा न्यूज

■ epaper.diwanews.com RNI No.-MAHMAR/2021/80669
▶ वर्ष-२ ■ अंक-४१ ■ मंगळवार, ९ मे २०२३
■ पाने-१२ ■ किंमत ४ रु.




## जेव्हा आपण पाच वर्षे मागे वळून पाहतो

# दिवा बदललेला दिसतोय!



लोकप्रतिनिधी हा अभ्यासू असावा.तो लोकांच्या गरजा,सोयी सुविधा, समस्या यांची जाण असणारा असावा... त्याच बरोबर त्या समस्या सोडविण्यासाठी शासन प्रशासनावर मजबूत पकड निर्माण करून विकासनिधी आणण्याची कला,कुवत त्याच्याकडे असावी...रमाकांत मढवी यांनी मागील पाच वर्षात याबाबतीत स्वत:ला सिद्ध केलं आहे.

अशक्य असे वाटणाऱ्या दिवा शहराचा कायापालट अवघ्या पाच वर्षात करण्याची किमया त्यांनी साधली आहे.

साधारण आठ किलोमीटर लांबीचे शहरातील विविध मुख्य रस्ते आणि ५ ते ६ किलोमीटर लांबीचे अंतर्गत रस्ते व पायवाटा अशी विक्रमी रस्ते विकासाच्या कामांसाठी भरघोस निधी आणण्यात रमाकांत मढवी यशस्वी झाले आहेत.

दिवा शहरातील २७ आणि २८ प्रभागात ज्या पद्धतीने रस्ते विकासाची कामे झाली आहेत ती नक्कीच येथील नागरिकांना दिलासा देणारी आहे.पावसाळ्यात दिवा शहरातील रस्ते म्हणजे चिखल हे समीकरण असायचे...मात्र रस्ते विकासासाठी वेगवेगळ्या विभागाच्या माध्यमातून मढवी यांनी जो निधी दिवा शहरात आणला,त्यांच्या या मेहनतीकडे दुर्लक्ष करता येणार नाही.आज शहरातील बहुतांश रस्ते हे सिमेंट काँक्रीटचे झाले आहे.अंतर्गत छोटे रस्ते सुद्धा मोठ्या प्रमाणात झाले आहेत.शहरातील जवळपास सर्वच प्रमुख रस्ते आज चांगल्या स्थितीत आहेत,काही ठिकाणी कामे सुरू आहेत.हा बदल लक्षात येण्यासारखा आहे.एकाच शहरात अवघ्या पाच वर्षात भरमसाठ निधी आणून पायाभूत सुविधा निर्माण करण्याचा मढवी यांचा हेतू कौतुकास्पद आहे.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार श्रीकांत शिंदे यांना येथील समस्यांची नेमकी जाणीव करून देण्यात मढवी हे यशस्वी झाल्याने आणि मुख्यमंत्री आणि खासदार श्रीकांत शिंदे यांनी सुद्धा दिव्यात विशेष लक्ष घातल्याने दिवा शहर बदलताना दिसतंय...जेव्हा आपण पाच वर्षे मागे वळून पाहतो,दिवा बदललेला दिसतोय!

– सुहास खंडागळे

# विकासपुरुष

## 5 वर्षात फरक दिसतोय.. दिवा बदलतोय!


खास मुलाखत...पान 6व 7 वर

## कार्यतत्पर

डॉ.श्रीकांत जी शिंदे (खासदार- कल्याण लोकसभा) यांच्या प्रयत्नाने दिवा चौक जवळ बांधण्यात आलेल्या सुलभ शौचालयाचे व स्नानगृहचे काम मा.उपमहापौर श्री.रमाकांत मढवी स्वतः लक्ष घालून करून घेतले!




## मेहनतीची जाण आणि खेळाडूंना प्रोत्साहन...

मा.उपमहापौर, शिवसेना दिवा शहरप्रमुख रमाकांत मढवी यांच्याकडून महिला महाराष्ट्र केसरी उपविजेती म्हणून कल्याण तालुका मांगरूल गावची कन्या वैष्णवीताई दिलीप पाटील हिने नावलौकिक मिळविल्याबद्दल शाल पुष्पगुच्छ अणि रोख रक्कम ५१०००हजार रुपये धनादेश देऊन सत्कार केला. पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



## हिंदुत्ववादी विचारधारेचे पाईक




राहुल गांधी यांनी हिंदूंचे दैवत स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा अपमान केल्यानंतर शिवसेना व भारतीय जनता पार्टी यांच्या माध्यमातून सावरकर गौरव यात्रा राज्यभरात करण्यात आल्या. दिवा शहरातून असंख्य शिवसैनिकांसह दिवा शहर प्रमुख रमाकांत मढवी डोंबिवली येथील सावरकर गौरव यात्रेत सहभागी झाले.हिंदुत्ववादी महापुरुषांचा अपमान सहन केला जाणार नाही अशी ठोस भूमिका त्यांनी मांडली.


**संपादक**

सुहास खंडागळे

**व्यवस्थापक**

सौ. अरुणा किरण जाधव

मो. ९९८७५१२००१

**छायाचित्रकार/प्रतिनिधी**

सुदेश सकपाळ

**वितरण प्रतिनिधी**

संतोष मदने

**ऑफीस पत्ता :-**

गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिश्चंद्र अपार्टमेंटच्या मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२.


## पक्ष संघटना म्हणजे कुटुंब, पक्ष मजबुतीसाठी कार्य!

दिवा विभागातील भाजप व अन्य पक्षातून अनेकांना शिवसेनेत मढवी यांनी प्रवेश देऊन पक्ष वाढीचा प्रयत्न दिव्यात केला,करत आहेत.एकाच वेळी भाजपचे ६३ पदाधिकारी व ४९२ कार्यकर्त्यांनी माजी उपमहापौर रमाकांत मढवी यांच्या उपस्थितीत प्रवेश करून राजकीय करिष्मा दाखवला होता. शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केलेल्यांना मढवी यांनी कुटुंबातील सदस्य प्रमाणे वागणूक दिली.. भाजपच्या उत्तर भारतीय मोर्चा,महिला मोर्चा,दिवा मंडळ व शहर पदाधिकाऱ्यांनी सेनेत एकाच वेळी प्रवेश केला होता.माणसे जोडणे ही मढवी यांची खासियत मानली जाते.







हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५

**संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**


Printed, Published and Owned by Suhas Shantaram Khandagale and Printed at Siddhhakala Print Media & Publication Pvt. Ltd. Plot No. W--230, TTC Industrial Area, Khairane, Navi Mumbai-400710. Dist. Thane, Maharashtra and Published at Shri Krupa Building, A-Wing, First Flr., Flat No. 101, Near Sent Marry School, Diva (E), Thane-400612 Taluka/Dist. Thane, State-Maharashtra. **Editor : Suhas Shantaram Khandagale, RNI No.-MAHMAR/2021/80669**



# कोरोना काळात आरोग्यदूत म्हणून उल्लेखनीय काम!

- दिवा शहरात कोरोना अधिक पसरू नये यासाठी सुरवातीपासून उपाययोजना करण्याचे काम रमाकांत मढवी यांनी केले.जेव्हा कोरोना या गंभीर आजारावर लस उपलब्ध झाली तेव्हा दाटीवाटीने गजबजलेल्या दिवा शहरात दोन व्हॅक्सिन सेंटर चालू करण्याचे काम रमाकांत मढवी यांनी केले. एस एम जी स्कूल आणि गणेश विद्यामंदिर येथे ही लसीकरण केंद्र सुरू करून नागरिकांना दिलासा दिला.
- एका दिवसात दहा हजार नागरिकांना कोरोना लसीकरण करण्याचा विक्रमही मढवी यांच्या पुढाकाराने दिव्यात पार पडला.
- छत्रपती शिवाजी महाराज हॉस्पिटल व शिवसेना दिवा शहर यांच्या संयुक्त विद्यमाने महाआरोग्य शिबिराचे आयोजन आकांक्षा हॉल मध्ये करून नागरिकांना दिलासा देण्याचे काम केले.
- कोरोना काळात शहरातील प्रत्येक नगरात गरीब गरजूंना अन्न वाटप करण्याचा उपक्रम राबविण्यात आला.दररोज सुमारे दोन हजार कुटुंबांना, ५२ दिवस अन्न वाटप करण्यात आले. याच काळात एकूण २४ हजार कुटुंबांना धान्य वाटप करण्यात आले.
- प्रत्येक नगरात आरोग्य शिबिराचे आयोजन करून नागरिकांना मोफत औषध देण्यात आली.कोरोना काळात अर्सेनिक अल्बम गोळ्यांचे वाटप,त्याचबरोबर मास्कचे वाटप प्रत्येक विभागात करण्यात आले.
- रक्ताचा तुटवडा असल्याकारणाने दिवा शहरात मढवी यांच्या मार्गदर्शनाखाली रक्तदान शिबिराचे नियमितपणे आयोजन करण्यात येते. मोफत हेल्थ कार्ड वाटप करण्यात येते.
- वेदांत हॉस्पिटल व दिवा शहर शिवसेना यांच्या संयुक्त विद्यमाने नागरिकांची डोळे तपासणी करून मोफत मोतीबिंदू ऑपरेशन करण्याचा उपक्रम रमाकांत मढवी राबत असतात!

– चरणदास म्हात्रे, दातिवली



# दातीवली हनुमान मंदिर परिसर विकास

दातिवली गावातील हनुमान मंदिराचा विकास रमाकांत मढवी यांच्या माध्यमातून अतिशय नियोजन पद्धतीने करण्यात आला आहे. आकर्षक असे मंदिर, शेजारी नागरिकांसाठी बहुउद्देशीय ओपन सभागृह, रंगमंच, त्याचबरोबर तरुणांसाठी ओपन जिम आणि बंदिस्त व्यायाम शाळा उभारण्यात आली आहे. व्यायाम शाळेच्या वरच्या मजल्यावर आरोग्य केंद्र अथवा डिजिटल शाळा उभारण्यासाठी जागा ठेवण्यात आली आहे. दातिवली गावाच्या विकासाच्या दृष्टीने येथील कामे महत्त्वाची आहेत. मंदिर परिसर सुशोभीकरण आणि नागरिकांसाठी विविध सेवा सुविधा असं काम रमाकांत मढवी यांनी या ठिकाणी केलेले पहायला मिळते.










## रेल्वे सुधारणांसाठी संघर्ष



# दिवा शहरात देखील खेळाडू घडले पाहिजेत यासाठीचा संकल्प




- दुर्लक्षित दिवा शहरात देखील उत्तम दर्जाच्या क्रीडा स्पर्धा आयोजित करून येथील खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे,उत्तम खेळाडू घडावेत हा दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून रमाकांत मढवी यांनी शहरात महत्वाच्या क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात पुढाकार घेतला.
- २००९ मध्ये राष्ट्रीय स्तरावरील महापौर चषक कबड्डी स्पर्धेचे आयोजन त्यांनी दिवा शहरात केले.
- २०१८ मध्ये राज्यस्तरीय महापौर चषक कबड्डी स्पर्धेचे आयोजन करून त्यांनी पुन्हा येथील कबड्डी प्रेमींना नवी संधी उपलब्ध करून दिली.
- दिवा महोत्सव अंतर्गत मॅरेथॉन स्पर्धा दरवर्षी आयोजित करण्याचे काम रमाकांत मढवी यांच्या मार्गदर्शनाखाली होत असते.
- या प्रतिष्ठित स्पर्धेत जवळपास ५००० विद्यार्थ्यांचा सहभाग असतो.
- दिवा विभागात ठिकठिकाणी क्रिकेट स्पर्धांचे आयोजन,भजन स्पर्धांचे आयोजन करण्याचे काम मढवी करत असतात.
- दिवा महोत्सव अंतर्गत चित्रकला निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धेचे आयोजन, गणेश उत्सव दरम्यान दिवा शहर अंतर्गत मकर सजावट स्पर्धा आयोजित करून येथील तरुणांनाच्या कलागुणांना वाव देण्याचा प्रामाणिक प्रयत्न रमाकांत मढवी करतात.



# दिवा शहराचा पाणी प्रश्न कायमचा सोडविण्यासाठी उपाययोजना!



- दिवा शहराचा पाणी प्रश्न कायमचा सुटला पाहिजे यासाठी मागील पाच वर्षात अतिशय नियोजन पद्धतीने रमाकांत मढवी पालिका प्रशासनाच्या माध्यमातून काम करत आहेत.
- एकीकडे विरोधक पाणी प्रश्नावरून टीका करत असताना दुसरीकडे रमाकांत मडवी हे पाणी वितरण व्यवस्था सुधारण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करत होते.
- मागील पाच वर्षात दिवा-आगासन मुख्य जलवाहिनी, मुंब्रा देवी कॉलनी मुख्य जलवाहिनी, बीआर नगर मुख्य जलवाहिनी, याचबरोबर शहरातील अन्य भागातील मुख्य जलवाहिन्या टाकण्याचे काम पूर्ण झालेलं आहे.
- यातील अनेक पाण्याच्या लाईन या वॉश आउट करून सुरू करण्यात आल्या आहेत. एकूण साडेचार किलोमीटर लांबीच्या मुख्य जलवाहिन्यांचे काम मागील पाच वर्षात पूर्ण झालेला आहे.
- पाणी समस्या ही एका दिवसात सुटणारी समस्या नाही त्यासाठी नियोजन महत्वाचे आहे. त्यामुळे टीका होत असली तरी दिवा शहराचा पाणी प्रश्न कायमचा सोडवायचा या अंतिम ध्येयापासून रमाकांत मढवी जराही विचलित झालेले नाहीत.

दिवा शहराला मुबलक पाणी पुरवठा करण्यासाठी मंजुर केलेल्या काटई ब्रिज- पलावा- आगासन फाटक या ३२ ईंची नविन जलवाहिनी टाकण्याच्या कामाचा शुभारंभ पलावा येथे माननिय खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांच्या हस्ते पार पडला त्यावेळचे छायाचित्र!



# दिवा शहरातील विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी शैक्षणिक उपक्रम

- रमाकांत मढवी हे नेहमीच राजकारणा पलीकडे सामाजिक भान ठेवून चालणारे नेते म्हणून ओळखले जातात.दिव्यातील सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थी स्पर्धेच्या युगात टिकला पाहिजे यासाठी त्याचा प्रामाणिक प्रयत्न सुरू असतो...
- दहावीच्या विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षा सोप्या जाव्यात,परीक्षेचे दडपण येऊ नये यासाठी एसएससी सराव परीक्षा मागील ३० वर्षांपासून घेतल्या जातात.
- यावर्षी दिवा शहरातील सुमारे बाराशे विद्यार्थी या सराव परीक्षेला बसले होते.
- विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून दरवर्षी १० वी १२ वी बोर्डाच्या परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार दिवा शिवसेनेमार्फत केला जातो.
- यावर्षी साडेचारशे उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना प्रोत्साहन देण्यात आले.
- दिवा महोत्सव या सांस्कृतिक उपक्रमात दरवर्षी चित्रकला स्पर्धा आयोजित केली जाते.
- शालेय विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव द्यावा हा त्यामागील प्रमुख उद्देश. यावर्षी चित्रकला स्पर्धेत बाराशे विद्यार्थी सहभागी झाले.
- तर निबंध स्पर्धेत सुमारे दहा हजार विद्यार्थी सहभागी घेतला हा एकप्रकारे विक्रमच म्हणावा लागेल.
- मागील सतरा वर्ष सलग हा उपक्रम सुरू आहे. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन घेऊन दिवा शहरातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा बद्दल प्रोत्साहन दिले जाते.या शहरातून चांगले अधिकारी घडावेत ही त्या मागची भूमिका रमाकांत मढवी यांनी बाळगली आहे.
- शालेय प्रवेशांबाबत गरीब गरजू नागरिकांना विद्यार्थ्यांना मदतीचा हात रमाकांत मढवी यांच्या माध्यमातून दिवा शिवसेना करत असते.
- सर्व सामान्य कुटुंबातील सर्व विद्यार्थ्यांना दरवर्षी शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात येतं. त्याचबरोबर शाळा व शिक्षकांच्या ज्या अडचणी आहेत त्या सोडवण्यासाठी देखील पुढाकार घेतला जातो. शालेय विद्यार्थ्यांच्या सामाजिक उपक्रमांना नेहमीच प्रोत्साहन दिलं जातं. कोरोना काळात मढवी यांच्या पुढाकाराने विद्यार्थ्यांसाठी विशेष आरोग्य शिबिर राबवून सहकार्य करण्यात आले.

– **विनोद पाटील**, दिवा



# शब्द पाळला... डम्पींग बंद

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे शब्द पाळण्यासाठी ओळखले जातात.दिवा डम्पिंग ग्राउंड बंद करणार ही घोषणा त्यांनी दिव्यात केली होती.दिवा वासीयांची ती मागणी होती.ही मागणी रमाकांत मढवी यांनी मुख्यमंत्र्यांकडे लावून धरली होती.अखेर ही मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंजूर करत ठाणे महानगरपालिकेने दिवा डम्पिंग ग्राऊंड कायमचे बंद केले.

भंडार्ली येथील डंपिंगमुळे दिवावासियांची आता कचऱ्याच्या त्रासातून मुक्तता झाली.

ठाणे महापालिकेने डंपिंग्र गाऊंडसाठी भंडार्ली येथील जागा ताब्यात घेतली असून भंडार्ली येथील जागा ही नागरी वस्तीपासून दूर असून या ठिकाणी टाकण्यात येणाऱ्या कचऱ्याचे शास्त्रोक्त पद्धतीने विघटन करण्यात येते.



डम्पिंग ग्राऊंड बंद झाल्यावर दिवावसीयांचा जल्लोष


## "आरोग्य सुविधांचे व्हिजन"




# सुसज्ज रुग्णालय, आरोग्य केंद्र आणि आपला दवाखाना



- दिवा शहरातील आरक्षित भूखंडावरील शेतकऱ्यांना मोबदला देऊन भूसंपादनाची प्रक्रिया लवकरच सुरू होणार आहे तसे आश्वासन जिल्हाधिकारी यांनी रमाकांत मढवी यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाला दिला आहे.
- मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या संकल्पनेतून आणि खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या पुढाकाराने शिवसेना शहरप्रमुख, मा.उपमहापौर रमाकांत मढवी व नगरसेवकांच्या मागणीनुसार दिवावासीयांचे शासकीय रुग्णालय, पोलीस स्टेशन, अग्निशामक केंद्र, माध्यमिक शाळा, प्रभाग समिती व इतर शासकीय कार्यालयांचे स्वप्न पूर्ण होण्याच्या दृष्टीने नियोजन करण्यात आले आहे.




- शिवसेना शहर प्रमुख,मा.उपमहापौर रमाकांत मढवी यांच्या नेतृत्वाखाली दिव्यातील शिष्टमंडळाने नुकतीच याविषयी जिल्हाधिकारी व ठामपा आयुक्तांची भेट घेतली. मा.जिल्हाधिकारी आणि ठाणे महानगरपालिका आयुक्तांनी लवकरच स्थानिक शेतकऱ्यांना योग्य तो मोबदला देऊन भूसंपादनाची प्रक्रिया सुरू करू असे सांगितले.
- दिवा शहरातील सामान्य नागरिकांना वैद्यकीय सेवा सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी शहरात सध्या एकूण ४ वंदनीय बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना सुरू आहेत.
- आपला दवाखाना या सेवे अंतर्गत जवळपास ७०० नागरिकांची ओपीडी आहे.पालिकेच्या आरोग्य विभागाचे हे यश आहे.
- दिवा शहरातील नागरिकांना वैद्यकीय सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी मागील दोन वर्षांपासून रमाकांत मढवी हे आरोग्य केंद्र उभारण्यासाठी पाठपुरावा करत असून त्यांच्या पाठपुराव्याला यश आले आहे.






- गणेश नगर भागात हे आरोग्य केंद्र लवकरच सुरू होणार आहे. याशिवाय साबे गावात देखील आरोग्य केंद्र सुरू केले जाणार आहे.
- एकंदरीत दिव्यातील आरोग्य व्यवस्था सुधारण्याच्या दृष्टीने रमाकांत मढवी यांच्या नेतृत्वाखाली नियोजन पध्दतीने काम होत आहे.

# आगरी कोळी संस्कृतीचा अभिमान... आगरी कोळी व वारकरी भवन

- दिवा शहरातील आणि जवळपासच्या भूमिपुत्रांसाठी सामाजिक व सांस्कृतिक भवन असावे या दृष्टीने रमाकांत मढवी यांनी पाठपुरावा सुरू केला आणि खासदार श्रीकांत शिंदे यांच्या पुढाकाराने शहरासाठी आगरी कोळी भवन आणि वारकरी भवन मंजूर झाले.
- आगरी कोळी समाजाच्या संस्कृतीचे जतन करणे व आगरी कोळी संस्कृती, परंपरा नागरिकांपर्यंत पोहचवण्या करीता व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठीचा प्रयत्न या उपक्रमातून होणार आहे.
- खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांनी ठाणे जिल्ह्यातील पहिले भव्य दिव्य आगरी कोळी व वारकरी भवन उभारण्याकरीता प्रत्यक्षात लक्ष घातले.खासदारांनी आगरी कोळी व वारकरी भवन उभारण्यासाठी प्रयत्न सुरू करून यशस्वी पाऊल टाकले.सन्माननीय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आशीर्वादाने कार्यतत्पर खासदार डॉक्टर श्रीकांत एकनाथ शिंदे यांचा पाठपुरावा व अथक प्रयत्नाने तसेच नगरसेवकांच्या मागणी नुसार खासदार श्रीकांत एकनाथ शिंदे यांनी आगरी कोळी व वारकरी भवन करिता १५ कोटी रुपये मंजूर केले असे रमाकांत मढवी आवर्जून सांगतात.
- स्थानिक आगरी कोळी भूमिपुत्र व येथील वारकरी संप्रदाय यांच्यासाठी आगरी कोळी भवन हे येथील सांस्कृतिक, सामाजिक परंपरा जपण्यासाठी मोठे योगदान देईल असा विश्वास रमाकांत मढवी व्यक्त करतात.
- कल्याण ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात स्थानिक आगरी समाजाचे वास्तव्य आहे. या समाजातील सामाजिक परंपरा, संस्कृती जपली जावी, येणाऱ्या पिढ्यांना आगरी कोळी समाजाचा ऐतिहासिक वारसा माहीत असावा.. त्याचबरोबर या भागात मोठ्या प्रमाणामध्ये असणाऱ्या वारकरी वारकरी संप्रदायाला त्यांचं हक्काचं भवन मिळावं या उद्देशाने दिवा शहर परिसरात होणारे आगरी कोळी व वारकरी भवन येथील नागरिकांसाठी हक्काचे ठिकाण होईल असेही मढवी याबाबत बोलताना सांगतात.



## दिवा पूर्वेतील नवीन तिकीट घराचे लोकार्पण

## दिवा रेल्वे स्टेशनचा कायापालट

दिवा शहरातील वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन या शहरासाठी महत्त्वाचे असणारे दिवा रेल्वे स्टेशन मधील प्रवासी सुविधांची गैरसोय टाळण्यासाठी विविध सोयी सुविधा पुरविण्यात याव्यात यासाठी रमाकांत मढवी हे मागील अनेक वर्षांपासून खासदार श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून पाठपुरावा करत होते.

खासदार श्रीकांत शिंदे यांनी दिवा शहराकडे आणि दिवा रेल्वे स्टेशन कडे विशेष लक्ष दिल्याने येथील बहुतांश समस्या मार्गी लागल्या आहेत. रेल्वे पादाचारी पूल दिवा पूर्व– पश्चिम ब्रिज, रेल्वे फलटावरील ,नव्याने झालेले दिवापूर्वेकडील तिकीट घर,त्याचबरोबर दिवा स्टेशन मधील अन्य सोयी सुविधा उपलब्ध करण्यामध्ये खासदार श्रीकांत शिंदे यांचा मोठा वाटा राहिला आहे.येथील समस्या खासदारांच्या निदर्शनास आणून देऊन त्या समस्यांचा पाठपुरावा शहर प्रमुख रमाकांत मढवी यांनी वारंवार केला आहे.





# दातिवलीचा कायापालट करण्याचे व्हिजन

## दातिवलीला पूर्ण स्थानकाच्या मागणीसह, स्थानकातील सुविधा, रेल्वेगाड्या आणि फेऱ्या वाढवण्यासाठी खासदार श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून पाठपुरावा!

### दातीवली रेल्वे स्थानकाला पूर्ण स्थानक दर्जा देण्याची आग्रही मागणी

दिवा आणि कोपर रेल्वे स्थानकादरम्यान दातिवली रेल्वेस्थानक उभारण्याची गेल्या ४० ते ४५ वर्षांपासूनची मागणी आहे. दातिवली स्थानकाच्या उभारणीमुळे त्याचा फायदा सुमारे चार लाख प्रवाशांना होईल. यामुळे दिवा रेल्वे स्थानकावरील गर्दीचा ताणही कमी होईल. भौगोलिकदृष्ट्या दातिवली स्थानकाचे महत्व ओळखून दातिवली स्थानकाच्या उभारणीची मागणी मान्य करावी, अशी विनंती रेल्वे राज्यमंत्री मा.श्री. रावसाहेब दानवे यांच्यासोबत त्यांच्या दिल्ली येथील कार्यालयात झालेल्या भेटीत करण्यात आली. या बैठकीस ठाण्याचे मा.उप महापौर रमाकांत दशरथ मढवी, ॲड. आदेश भगत आणि शैलेश पाटील उपस्थित होते.

▶ देशासाठी महत्वाकांक्षी असलेला बुलेट ट्रेन प्रकल्पातही दातिवली स्थानकाचा समावेश आहे. याच भागात एमएमआरडीए बीकेसी प्रमाणे विकास केंद्र विकसीत करणार आहे. मध्य रेल्वे आणि कोकण रेल्वेच्या प्रवाशांसाठी दातिवली स्थानक महत्वाचे केंद्र बनण्याची क्षमता असलेले ठिकाण आहे. कल्याण-ठाणे-मुंबई हा जलमार्ग ही दातिवली जवळून जातो. त्यामुळे दातिवली हे या सर्वांचे केंद्र ठरू शकते, असे यावेळी बैठकीदरम्यान स्पष्ट करण्यात आ... यासर्वांचा विचार करुनच दिवा आणि कोपर रे... स्थानकादरम्यान दातिवली स्थानकाच्या उभारणीसाठी गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा करत दातिवली स्थानकाच्या उभारणीची मागणी करत असल्याचे यावेळी सांगत दातिवली स्थानकाची उभारणी करण्याच्या प्रस्तावाला तातडीने मंजुरी द्य... अशी विनंती राज्यमंत्री श्री.दानवे यांना करण्यात आल...

▶ यासोबतच प्रवाशांच्या सोयीच्या दृष्टिकोनातून सध्या हॉल्ट स्टेशन अर्थात थांबा स्थानक म्हणून असलेल्या दातिवली स्थानकाला पूर्ण स्थानकाचा दर्जा द्यावा, अशी मागणी देखील केली. दिवा - पनवेल, डहाणू - पनवेल, दिवा-रोहा, दिवा-सावंतवाडी, दिवा-मडगाव इ. रेल्वे गाड्या दातिवली येथे थांबतात आणि अनेक प्रवासी येथून गाड्या पकडतात. मात्र स्थानकात प्राथमिक सोयी-सुविधांची वानवा असून पिण्याच्या पाण्याची सुविधा, स्वच्छतागृह, तिकीट खिडकी स्थानकात नाही. त्यामुळे या स्थानकाला पूर्ण स्थानकाचा दर्जा दिल्यास या सर्व सोयी-सुविधा प्रवाशांना देता येतील.दातीवली स्थानकाच्या विकासासाठी मढवी हे खासदार श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून प्रयत्नशील आहेत.

▶ कल्याण, डोंबिवली, ठाणे आणि नवी मुंबईप्रमाणेच दिवा, दातिवली, आगासन, निळजे, तळोजा, नावडे, नावडे, कळंबोली यांची मोठ्या प्रमाणावर वाढ होत असून येथेही लोकसंख्या वाढते आहे. शिक्षण, रोजगारासाठी प्रवास करणाऱ्यांची संख्याही वाढली आहे. त्यामुळे दिवा पनवेल रेल्वे गाड्यांची संख्या वाढवण्यासाठी पाठपुरावा सुरू.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते पनवेल या मार्गावर लोकलसेवा सुरू करून त्या दिवा मार्गे नेण्याचीही मागणी रेल्वे मंत्र्यांकडे करण्यात आली आहे.



**रेल्वे राज्यमंत्री मा. रावसाहेब दानवे यांच्यासोबत खासदारांच्या नेतृत्वाखाली भेट!**



# बेतवडे गावात विविध विकास कामे, पाहणी दौरा!











बेतवडे गावात गावदेवीनगर परीसरातील पिण्याच्या पाण्याची वाढती टंचाई लक्षात घेता ४ इंच व्यासाच्या जलवाहिनी टाकण्यात आली. वेशीग्रामदेवता येथील परिसर सुशोभीकरण करण्याचा आणी द्वारकानाथ पाटील ते बाळाराम पाटील गावातला मुख्यरस्ता काँक्रिटीकरण व मुख्य ८ इंच व्यासाची नवीन जलवाहिनी जोडन्याचे काम करण्यात येत आहे. या पाहणी दौऱ्यावर दरम्यान सन्माननीय श्री रमाकांत मढवी तसेच विभाग प्रमुख चरणदास दादा म्हात्रे, शाखा प्रमुख सुरेश पाटील, शाखाप्रमुख महेश पाटील, जेष्ठ शिवसैनिक विजय भोईर, श्री अनंत महाराज, जयेन्द्र पाटील, सोपान पाटील, प्रभाग समिती अधिकारी वर्ग , मी तसेच सर्व पदाधिकारी व ग्रामस्त उपस्थित होते.

# कामाच्या दर्जाबाबत अधिकाऱ्यांवर लक्ष!







श्लोक नगर येथे सुरु असलेल्या रस्त्याच्या कामाची पाहणी करताना माझी उप महापौर श्री रमाकांत मढवी साहेब, विभाग प्रमुख - चरण दास म्हात्रे, विनोद मढवी उप विभाग प्रमुख मनोज गुप्ता, उप शाखा प्रमुख अमृत लाल गुप्ता, अभिषेक (सोनू) पाण्डेय व शिवसेने चे कार्यकरते उपस्थित होते...

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना.एकनाथजी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली कल्याण लोकसभा खासदार श्री. श्रीकांतजी शिंदे यांच्या प्रयत्नाने श्री. रमाकांत मढवी यांनी मंजूर केलेल्या म्हातार्डी गाव रस्ता डांबरीकरणाचे काम सुरु असताना रात्री ३:३० वाजता रमाकांत मढवी यांनी प्रत्यक्ष पाहणी केली.यावेळी विभागप्रमुख श्री. चरणदास म्हात्रे ,श्री.शशिकांत पाटील,उपविभागप्रमुख श्री. शरद पाटील, शाखाप्रमुख श्री. जयदास शेलार, श्री. शिवदास पाटील, श्री. महेश पाटील, श्री. अरुण म्हात्रे, श्री. शंकर म्हात्रे, उपशाखाप्रमुख मंगेश शेलार, धर्मेंद्र शेलार, भगवान माळी, संदीप वायले आदी उपस्थित होते.











## कर्तव्यदक्ष लोकप्रतिनिधी म्हणून ओळख

दिवा शहरातील विविध रस्त्यांच्या विकासासाठी कामे मंजूर झाल्यानंतर त्या कामांचा दर्जा आणि होत असलेले काम याबाबत स्वत: जातीने हजर राहून रमाकांत मढवी हे संबंधितांना सूचना देत असतात. दिवा शहरात होणारी विकास कामे ही दर्जेदार झाली पाहिजेत.त्यामध्ये कोणत्याही त्रुटी राहू नयेत अशी भूमिका रमाकांत मढवी यांची असते. एका जागरूक लोकप्रतिनिधी हे लक्षण म्हणावे लागेल!शहरातील दिवा आगासन रोड,दिवा-मानपाडा रोड,मुंब्रा देवी कॉलनी रोड,म्हातार्डी रस्ता याच बरोबर शहरातील अन्य रस्त्यांच्या कामात मढवी हे स्वतः लक्ष घालून जबाबदार लोकप्रतिनिधी म्हणून वेळोवेळी काम पाहत असतात.

# जनतेचे अधिकृत घराचे स्वप्न साकार होणार!



## दिवावासीयांच्या हक्काच्या अधिकृत घरासाठी क्लस्टर योजना!

दिवा शहरातील नागरिकांना ठाणे शहरातील नागरिकांप्रमाणेच नागरी सुविधा मिळाव्यात, आपलं हक्काचं अधिकृत घर मिळावं या दृष्टीने रमाकांत मढवी यांनी मागील पाच वर्षांपासून पालिका प्रशासनाकडे पाठपुरावा करून दिव्यासाठी ही क्लस्टर योजना मंजूर करून घेतली

दिवा शहरात क्लस्टर योजना होण्याच्या दृष्टीने येथील इमारतींचं तातडीने सर्वेक्षण व्हावं या दृष्टीने महापालिकेने अर्थसंकल्पात त्यासाठीची विशेष तरतूद केली.

खासदार श्रीकांत शिंदे यांच्या पुढाकाराने दिवा शहरातील क्लस्टर योजना लवकरात लवकर मार्गी लागण्याच्या दृष्टीने प्रयत्न झाले आणि मागील जानेवारीत दिवा शहरात प्रत्यक्ष क्लस्टर योजनेच्या सर्वेक्षणास सुरुवात झाली.

शहरातील नागरिकांना त्यांच्या अनधिकृत घराच्या मोबदल्यात अधिकृत हक्काचे घर मिळणार असल्याने नागरिकांनीही या योजनेचा स्वागत केलं. समाधान व्यक्त केलं.

या योजनेअंतर्गत शहरात नागरिकांना चांगले रस्ते, गार्डन, खेळाची मैदान व सुसज्ज घर मिळणार असल्याने नागरिक या योजनेचे स्वागत करत आहेत.

दिवा शहरातील सर्वसामान्य नागरिकांना जुन्या अनधिकृत घरांमध्ये जीव मुठीत घेऊन राहण्यापेक्षा त्यांना क्लस्टर योजनेच्या माध्यमातून अधिकृत आणि दीर्घकाल टिकणारी घरे उपलब्ध करून दिल्यास येथील नागरिकांचे जीवन उंचावेल हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून, नोकरदार वर्ग असणाऱ्या या शहरातील सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्याचे काम रमाकांत मढवी यांनी क्लस्टर योजना दिव्यात आणून केले.

क्लस्टर योजनेचे वैशिष्ट्य असे की, आज दिवा शहरात जे बकाल स्वरूप दिसते..ते क्लस्टर योजना झाल्यानंतर दिवा शहराचे स्वरूप अतिशय नियोजन पद्धतीने झालेले आपल्याला दिसेल. शहराच्या विकासाचे व्हिजन ठेवून रमाकांत मढवी वाटचाल करत असतात म्हणूनच त्यांना दिवा शहराचे नेते म्हणून लोक मान्यता आज प्राप्त झाली.